# <u>संसाराचा खेळ</u>

मांडला हा खेळ , भावनांचा खोटा

नात्यांची वाट साऱ्या लागली रे...

वृथा अहंकार, नाही स्वाभिमान

नैराश्य वाट्याला आले रे...

आळसाच्या अंगी, आजार मुक्कामी

ते दुख:त सारे जीवन घालवी रे...

सुख त्याच्या दारी सदा विसावते

कष्टाची भाकर जे खाती रे...

जो झोपून थकतो, तरीही लोळतो

ऱ्हासाकडे वेगाने तो पळतो रे...

मिळून जे राहती, घरी दारी सारे

सुख सदा विभागुनी घेती रे...